पुण्यनगरी ५.५.१८.

# गुन्हेगारीला बसणार आळा




## ▪अत्याधुनिक सीसीटीव्ही नियंत्रण कक्षाचे लोकार्पण

▪ **मीरा रोड** । मीरा-भाईंदर शहरावर एकाच वेळी एक हजारापेक्षा जास्त सीसीटीव्ही कॅमेऱ्याद्वारे नजर ठेवली जाणार आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी अत्याधुनिक सीसीटीव्ही नियंत्रण कक्षाचे लोकार्पण केले. यावेळी सीसीटीव्ही कॅमेऱ्यामुळे शहारातील गुन्हेगारीवर पोलिसांना नियंत्रण ठेवता येणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

मीरा-भाईंदर शहरात दोन वर्षांपूर्वी पोलीस आयुक्त सदानंद दाते यांची नियुक्ती झाल्यानंतर त्यांनी एक कॅमेरा शहरासाठी ही संकल्पना आणली. या त्यांच्या संकल्पनेला नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला होता. त्यावेळी शहरात दुकानदारांनी शेकडो कॅमेरे लावले होते. नंतर महापालिकेने संपूर्ण शहरात ३५०० सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचा संकल्प केला आहे.



›› नियंत्रण कक्षात पोलीस अधिकाऱ्यांना एखाद्या विशिष्ट विभागावर लक्ष ठेवायचे असल्यास त्याच भागाची लिंक घेऊन त्या भागावर लक्ष केंद्रित करता येणार आहे. याशिवाय ५० ते ६० दिवसांचे सीसीटीव्ही फुटेज ठेवता येणार आहे.

›› हा नियंत्रण कक्ष मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस, आयुक्तालयाकडे हस्तांतर करण्यात आला आहे. नियंत्रण कक्ष हस्तांतरण केला असला तरीही त्याची देखभाल व दुरुस्ती महापालिकेकडून होणार आहे.

सध्या महापालिकेकडून १२००च्या आसपास विविध ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचे काम पूर्ण झाले आहे. पालिकेने सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी १७४ कोटी रुपयांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला आहे. यात भांडवली खर्च, तसेच पाच वर्षांचा नियंत्रण कक्ष चालविण्याचा खर्च समाविष्ट आहे. या अहवालाला गृहविभागाने मान्यता दिलेली आहे. परंतु हा निधी महापालिकेला अद्याप मिळालेला नाही. तरीही महापालिकेच्या सार्वजनिक बांधकाम, विद्युत विभाग व संगणक विभाग, नगरसेवक निधी यांनी खर्च करून १२०० च्या आसपास सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. हे सीसीटीव्ही सर्व प्रमुख रस्ते, नाके, शहराची प्रवेशद्वारे, शहरातील अंतर्गत रस्ते इ. ठिकाणी बसवले आहेत. सहा पोलीस ठाणे उभारलेल्या अद्ययावत अशा सीसीटीव्ही नियंत्रण कक्षाशी जोडण्यात आली आहेत. त्यामुळे एकाच नियंत्रण कक्षाद्वारे संपूर्ण शहरावर लक्ष ठेवले जाणार आहे.

हा नियंत्रण कक्ष उभारण्यासाठी पालिकेने सुमारे ७ कोटी रुपये खर्च केला आहे. नियंत्रण कक्षाचे लोकार्पण करताना फडणवीस यांनी सांगितले की, महापालिकेने दिलेल्या प्रकल्प अहवालाला मंजुरी देण्यात आली आहे. तो निधीदेखील लगेच पालिकेला वर्ग करण्यात येईल. त्यामुळे हा नियंत्रण कक्ष सुसज्ज व अद्ययावत करण्यास मदत होईल.

या नियंत्रण कक्षाद्वारे शहरातील गुन्हेगारी रोखण्यास मदत होणार आहे. तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवरही नियंत्रण केले जाणार आहे. सर्व सिग्नलवर सीसीटीव्ही कॅमेरे बसवल्याने नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांच्या घरी ई-चलान पाठवून दंड वसूल करण्यात येणार आहे. त्यामुळे वाहतूक विभागालाही सीसीटीव्ही नियंत्रण कक्षाचा फायदा होणार आहे.

Scanned with CamScanner

म. टा. ५. ५. १.

# बाजार करातून विक्रेत्यांची लूट

## वसई-विरारमध्ये निश्चित केलेल्या दरापेक्षा अधिक रकमेची वसुली

**म. टा. वृत्तसेवा, वसई**

वसई-विरार शहर महापालिका हद्दीतील काही दैनंदिन आणि आठवडा बाजारांमध्ये निश्चित केलेल्या बाजार करापेक्षा अधिक रक्कम पालिकेच्या कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येत असल्याचा आरोप फेरीवाले आणि लहान व्यावसायिकांनी केला आहे. बाजार करावाबत लूट टाळण्यासाठी सर्व बाजारांत ठिकठिकाणी बाजार कराचे दरपत्रक लावण्याचे आदेश पालिका आयुक्तांनी दिले होते. मात्र हे फलक सध्या गायब झाले असून पुन्हा बाजार कराची अतिरिक्त वसुली सुरू झाल्याने फेरीवाले त्रस्त झाले आहेत.

वसई विरार शहर महापालिका हद्दीत प्रत्येक प्रभागात आठवडा व दैनंदिन बाजार भरतात. अनेक फेरीवाले व लहान व्यावसायिक आपल्या वस्तू विक्रीसाठी येत असतात. यामध्ये दिव्यांग, स्थानिक, आदिवासी विक्रेते यांच्यासह आपल्या शेतातील भाजीपाला व अन्य उत्पादने विकण्यासाठी येणारे स्त्री-पुरुष शेतकरी यांचाही समावेश असतो. यांच्याकडून दैनंदिन बाजार कराची वसुली करण्यात येते. पालिकेने प्रत्येक प्रभागात आठवडा व दैनंदिन बाजारात करवसुलीसाठी निविदा प्रक्रियेद्वारे नेमलेल्या कंत्राटदारामार्फत ही वसुली करण्यात येते. पालिकेने प्रत्येक फेरीवाल्यासाठी बाजार कराची रक्कम ठरवून दिली आहे.

मात्र असे असूनही, निश्चित ठरलेल्या रकमेपेक्षा अधिक रक्कम कंत्राटदार फेरीवाल्यांकडून उकळत आहेत. सकाळच्या वेळी बसलेल्या विक्रेत्यांकडून ७० रु., तर सायंकाळी बसलेल्या विक्रेत्यांकडून ५० रुपयांची वसुली करून, त्यांना अवघी ३० रुपयांची पावती दिली जात असल्याचा आरोप करण्यात आला होता.

फेरीवाले, विक्रेते, सामाजिक कार्यकर्त्यांनी आणि विविध सामाजिक संस्थांनी ही अतिरिक्त वसुलीची बाब पालिकेच्या निदर्शनास आणून दिली होती. या तक्रारींनंतर महापालिका आयुक्तांनी पालिकेचे करफलक बाजारात लावण्याच्या सूचना प्रभाग समितीच्या सहायक आयुक्तांना केल्या होत्या. त्यानुसार, काही दिवस निश्चित रकमेची वसुली करण्यात येत होती. मात्र आता पुन्हा एकदा पालिका आयुक्तांचे आदेश धाब्यावर बसवून, या बाजारांतून पूर्वीप्रमाणे बेकायदा वसुली सुरू झाली आहे. तसेच दरफलकही गायब झाले आहेत.

शहरात भरणारे अनेक बाजार खासगी जागांमध्ये भरत असल्याने, त्यांना पालिकेची परवानगी नाही. यातील अनेकजण फेरीवाल्यांना पालिकेच्या रस्त्यावर आणून बसवतात, त्यामुळे रहदारीत अडथळा निर्माण होत असतो. मात्र पालिकेकडून त्यावर कोणतीही कारवाई होत नाही. हीच बाब बाजारात बेकायदा वसुली करणाऱ्यांच्या पथ्यावर पडली आहे. त्यामुळे अशांवर कारवाई करावी, अशी मागणी फेरीवाले तसेच स्थानिक विक्रेत्यांकडून होत आहे.



### संस्थेच्या नावाखाली बेकायदा वसुली ?

नालासोपारा येथील येथे भाजी विक्रेता कल्याणकारी संस्थेच्या नावाने फेरीवाल्यांकडून वसुली केली जात असल्याचे समोर आले आहे. नालासोपारा-अलकापुरी येथे भरणाऱ्या अनधिकृत बाजारातून संस्थेच्या नावाखाली प्रतिदिन प्रति फेरीवाला २० रुपये वसूल केले जात असल्याचे फेरीवाल्यांचे म्हणणे आहे. या बाजारात दोनशेहून अधिक फेरीवाले आहेत. त्यांच्याकडून दररोज चार हजार, तर महिन्याला एक लाख २० हजार रुपये वसूल केले जात आहेत. त्यामुळे या बेकायदा बाजारातून होणारी बेकायदा वसुली बंद करावी आणि वसुली करणाऱ्यांवर कारवाई व्हावी, अशी मागणी फेरीवाले तसेच नागरिकांनी केली आहे.

Scanned with CamScanner

सकाळ ५.५.१.

# कचऱ्यावरील प्रक्रियेसाठी जपानी तंत्रज्ञानाचा वापर

## मिरा-भाईंदरसह वसई-विरारसाठी संयुक्त प्रकल्पाचा प्रस्ताव

भाईंदर, ता. २३ (बातमीदार) : शहरातील कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी जपानी तंत्रज्ञान उपयोगात आणण्याचा प्रस्ताव आहे. आमदार गीता जैन यांनी नुकताच जपान दौरा केल्यानंतर त्या ठिकाणच्या तंत्रज्ञानावर आधारित मिरा-भाईंदरसह वसई-विरार शहरासाठी संयुक्तपणे कचरा प्रक्रिया राबविण्याचा प्रस्ताव त्यांनी प्रशासनाला दिला आहे.

विधिमंडळ सदस्यांनी नुकताच जपानचा दौरा केला. या दौऱ्यात मिरा भाईंदरच्या आमदार गीता जैनदेखील सहभागी झाल्या होत्या. या दौऱ्यात जपानमधील घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाला त्यांनी भेट दिली. त्या ठिकाणी कचरा प्रक्रियेसाठी वापरण्यात येणारे तंत्रज्ञान मिरा-भाईंदर व वसई-विरार या शहरात निर्माण होणाऱ्या कचऱ्यावर संयुक्तपणे प्रक्रिया करण्यासाठी वापरल्यास त्याचा दोन्ही शहरांना मोठा फायदा होईल, असे मत जैन यांनी व्यक्त केले आहे.

मिरा-भाईंदरसह वसई-विरार यांच्या संयुक्त प्रकल्पासाठी जागा तसेच सुमारे तीन हजार कोटी रुपयांच्या निधीची उभारणी यावर संबंधितांशी तसेच राज्य सरकारशी चर्चा करण्यात येणार आहे, असेही जैन यांनी सांगितले.

### असे आहे जपानी तंत्रज्ञान

जपानमध्ये अत्यंत अत्याधुनिक पद्धतीने कचऱ्यावर प्रक्रिया केली जाते. त्यासाठी भारतीय चलनानुसार एकंदर तीन हजार कोटी रुपयांचा प्रकल्प उभारण्यात आला आहे. हा प्रकल्प संपूर्णपणे स्वयंचलित असून मनुष्यबळाचा कमीत कमी वापर केला जातो. प्रकल्पात अतिशय स्वच्छता बाळगली जाते. दररोज गोळा होणारा कचरा बंदिस्त गाड्यातून प्रकल्पात आणला जातो. तो स्वयंचलित पद्धतीनेचे प्रकल्पात रिकामा केला जातो. रिकाम्या झालेल्या गाड्या पूर्णपणे स्वच्छ करूनच प्रकल्पातून बाहेर पडतात. आलेला कचऱ्याचे वर्गीकरण करून धातू, प्लास्टिक, लाकूड आदीवर स्वतंत्रपणे करून त्याचा पुनर्वापर केला जातो; तर उर्वरित कचरा इन्सिनेरेटरमध्ये जाळून टाकला जातो. विशेष म्हणजे कचरा जाळताना कोणत्याही प्रकारचा धूर निर्माण होत नाही. त्यामुळे प्रदूषण होत नाही, अशी माहिती आमदार गीता जैन यांनी दिली.



### कचरा वर्गीकरणामुळे साशंकता

जपान येथे कचऱ्याचे शंभर टक्के वर्गीकरण होत असल्यामुळे त्या ठिकाणी प्रकल्प यशस्वी ठरला आहे; पण मिरा-भाईंदरमध्ये अवघ्या पन्नास ते साठ टक्के कचऱ्याचे वर्गीकरण होत आहे. त्याबाबत नागरिकांच्या पातळीवर अद्याप उदासीनताच आहे. शिवाय मिरा भाईंदर व वसई विरार या दोन्ही शहरांच्या संयुक्त प्रकल्पाचा प्रस्ताव याआधीदेखील पुढे आला होता; मात्र त्याबाबत पुढे कोणतीही प्रगती झाली नाही. त्यामुळे या दोन्ही मुद्द्यांवर जपानी तंत्रज्ञानावर आधारित कचरा प्रकप कितपत यशस्वी होईल, याबाबत साशंकता व्यक्त होत आहे.

लोकमत ५-५-१९.

# आई ओरडल्याने मुलीने घेतला गळफास

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : १३ वर्षाच्या अल्पवयीन मुलीने रागाच्या भरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे समोर आले आहे. विशालनगर येथील मंत्रा अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या गीता छोटू यादव या शनिवारी दुपारी एकच्या सुमारास आपली मुलगी शिवांगी हिला आंघोळ करत नाही म्हणून ओरडल्या. याचा राग येऊन शिवांगी हिने घरातील बेडरूममध्ये लोखंडी अँगलला लुंगीच्या सहाय्याने गळफास लावून घेतला. तिला त्वरित नजीकच्या डॉ. कणेकर हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले, मात्र तेथील डॉक्टरांनी तिला तपासून मृत घोषित केले. शनिवारी माणिकपूर पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

Scanned with CamScanner

लोकसत्ता पा-नं. ३.

# राज्यात ५४५ नवे करोना रुग्ण; दोन बाधितांचा मृत्यू

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** राज्यात काही दिवसांपासून करोना रुग्णांच्या संख्येत घट होत असून रविवारी ५४५ नव्या रुग्णांची नोंद झाली. तर दोन बाधितांचा मृत्यू झाला.

राज्यात रविवारी मृत्यू झालेल्या बाधितांमध्ये मुंबईमधील एक, तर दुसरा रत्नागिरीमधील आहे. मुंबईमध्ये मृत्यू झालेली ३३ वर्षीय व्यक्ती क्षयरोगाने ग्रस्त होती.



१ जानेवारीपासून आजपर्यंत ८६ कोरोना रुग्णांचा मृत्यू झाला. त्यापैकी ७२.०९ टक्के रुग्ण ६० वर्षांवरील आहेत तर, ८४ टक्के रुग्ण सहव्याधीग्रस्त, तर १३ टक्के सहव्याधी नसलेले रुग्ण आहेत. सध्या मृत्युदर १.८१ टक्के एवढा आहे. तपासण्यात आलेल्या ८ कोटी ६८ लाख ९३ हजार ७०९ प्रयोगशाळा नमुन्यांपैकी ८१ लाख ६१ हजार ८९४ (९.३९ टक्के) रुग्ण आढळले. राज्यात सध्या उपचाराधीन रुग्णांची संख्या ६ हजार ५५ आहे.

## दिवसभरात दहा हजारांवर नव्या रुग्णांची नोंद

**नवी दिल्ली :** केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने दिलेल्या आकडेवारीनुसार देशभरात रविवारी दहा हजार ११२ नवीन करोना रुग्णांची नोंद झाली. तर, एकूण सक्रिय रुग्णांची संख्या ६७ हजार ८०६ झाली आहे. सकाळी आठला अद्ययावत केलेल्या या आकडेवारीनुसार २९ मृत्यूंसह आतापर्यंत एकूण करोना मृतांची संख्या पाच लाख ३१ हजार ३२९ वर पोहोचली आहे. नवीन करोना रुग्णसंख्येसह देशातील एकूण करोनाबाधितांची संख्या चार कोटी ४८ लाख ९१ हजार ९८९ झाली आहे. दैनंदिन करोनाबाधितांचा दर ७.०३ टक्के आणि साप्ताहिक दर ५.४३ टक्के नोंदवला गेला. एकूण संसर्गाच्या तुलनेत सक्रियता दर ०.१५ टक्के आहे.

पुण्यनगरी पु-पा.४.

# चोरी झालेले मोबाइल नागरिकांना परत

## नागरिकांकडून पोलिसांचे आभार

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील विविध पोलीस ठाणे हद्दीतील २५ लाखांचे १०० मिसिंग, चोरी झालेले मोबाइल मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेने हस्तगत करून नागरिकांना गुन्हे पोलीस उपआयुक्तांच्या हस्ते परत केले.

मीरा-भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील विविध पोलीस ठाण्यांत सर्वसामान्य नागरिकांचे मोबाइल मिसिंगचे प्रमाण वाढले होते. याबाबत पोलीस ठाण्यात दाखल असलेले मिसिंग मोबाइलमध्ये नागरिकांचे संपर्क, फोटो, व्हिडिओ, महत्त्वाची कागदपत्रे, आर्थिक व्यवहार इत्यादी व इतर महत्त्वाची माहिती असते. त्यामुळे एखाद्या नागरिकाचा मोबाइल चोरी झाला किंवा हरवला तर ती व्यक्ती अस्वस्थ होते. याची दखल घेऊन वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी नागरिकांचे हरवलेले किंवा चोरी झालेल्या मोबाईलचा शोध घेऊन त्यांना परत करण्याची मोहीम हाती घेण्याचे आदेश दिले. त्यानुसार मध्यवर्ती गुन्हे शाखेचे पोहवा गोविंद केंद्रे, राजविर संधु, पो. अंमलदार हनुमंत सूर्यवंशी, तसेच इतर अधिकारी आणि अंमलदारांनी सर्व पोलीस ठाण्यातून मिसिंग, चोरी झालेल्या मोबाईलची माहिती घेऊन त्याचे तांत्रिक विश्लेषण केले. त्याआधारे मीरा भाईंदर वसई विरार, बृहन्मुंबई, ठाणे शहर, नवी मुंबई पोलीस आयुक्तालय, तसेच पालघर व ठाणे ग्रामीण अधीक्षक कार्यालय परिसरात तपास केला. चोरी, हरवलेल्या मोबाइलचा शोध घेऊन अद्याप आयुक्तालयातील वेगवेगळ्या पोलीस ठाण्यांअंतर्गत नोंद असलेले एकूण १०० मोबाइल हस्तगत केले. हे मोबाइल शुक्रवारी सायंकाळी गुन्हे शाखा कार्यालय, कनकिया, मीरा रोड येथे गुन्हे पोलीस उपआयुक्त अविनाश अंबुरे यांच्या हस्ते नागरिकांना परत देण्यात आले. मुद्देमाल हस्तांतरण कार्यक्रमादरम्यान नागरिकांनी पोलिसांचे आभार मानले.

Scanned with CamScanner

पुढारी ५-५-१.


# बेकायदेशीर चालणाऱ्या लॉटरी सेंटरवर पोलिसांची कारवाई

## मिरारोड येथे चालवला जात होता बेकायदा धंदा

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

भाईंदर पश्चिम येथे राजश्री सुपर लोट्टो या नावाने सुरू असलेल्या लॉटरीच्या दुकानाला महाराष्ट्र शासनाचा कोणताही परवाना नसताना ऑनलाईन जुगार खेळवत असल्यामुळे त्या लॉटरीच्या दुकानावर भाईंदर पोलिसांनी कारवाई करून दोघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

मिरा-भाईंदर शहरात गेल्या काही दिवसांपासून बेकायदेशीरपणे लॉटरीची दुकाने सुरू झाली आहेत. याबाबतचे दैनिक पुढारीमध्ये वृत्त प्रकाशित झाल्यानंतर पोलिसांकडून बेकायदेशीर चालणाऱ्या लॉटरी दुकानदाराविरुद्ध कारवाई करण्यास सुरुवात झाली आहे. शुक्रवारी दुपारी भाईंदर पश्चिम येथील राधा क्रिष्णा कुटीर बिल्डिंग, चेतन वाईन्सच्या बाजुला राजश्री सुपर लोट्टो या नावाने लॉटरीचे दुकान सुरू असून महाराष्ट्र शासनाकडुन



कोणताही परवाना नसताना ऑनलाईन जुगार खेळवत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलीसांनी पथकासह तेथे छापा टाकला असता त्या ठिकाणी बेकायदेशीर लॉटरीच्या नावावर जुगार खेळत असल्याचे दिसून आले. तेथे संगणकावर वेगवेगळे लॉटरीचे आकडे लावून २ रुपयांच्या बदल्यात जिकल्यानंतर १८० रुपये दिले जात होते. नंबर लागला नाहीतर कोणतीही रक्कम परत दिली जात नाही, अशी माहिती लॉटरी दुकानदार महेंद्र शंकर पटेल याने दिली. त्यावेळी लॉटरीच्या दुकानातुन बेकायदेशीर ऑनलाईन जुगार खेळवण्याचे साहित्य व रोख रक्कम असा १९२२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. राजश्री सुपर लोट्टो नावाची लॉटरी महेंद्र शंकर पटेल (२२) गौतम पटेल, यांनी संगणमताने महाराष्ट्र शासनाची अगर इतर कोणत्याही शासकीय यंत्रणेची कोणतीही परवानगी न घेता बेकायदेशीररीत्या आकडे लावुन ऑनलाईन जुगार खेळवत असतांना मिळुन आले म्हणुन त्यांच्याविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम ४ ; ५ प्रमाणे भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लोकमत ५-५-१.



# पालिकेच्या आशीर्वादाने रस्ते-पदपथावरच धंदा

## पालिकेच्या मंडईत बसायचे कशाला?

**धीरज परब**

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा-भाईंदर महापालिकेच्या आशीर्वादाने रस्ता-पदपथावरच बेकायदा अतिक्रमण करून कमी खर्चात चांगला धंदा होतो, तर मग पालिकेच्या मंडईत बसणार तरी कोण, अशी परिस्थिती शहरात आहे. त्यामुळे पालिकेच्या मंडईना टाळे लागले आहे.

मीरा-भाईंदर शहरात महापालिका प्रशासन, काही राजकारणी व माजी नगरसेवक यांच्या आशीर्वादाने शहरातील रस्ते-पदपथांवर अतिक्रमण करून फेरीवाले भाजी-फळे आदींची विक्री करतात. नोंदणीकृत फेरीवाल्यांसाठी पालिकेने शहरात आठ भाजी मंडई पत्राशेडमध्ये सुरू केली होती. सदर पत्राशेडमध्ये सुरुवातीला काही काळ भाजी-फळ विक्रेते बसत होते. त्या ठिकाणी सोयी-सुविधा मिळून नाममात्र भाडे द्यावे लागत होते, मात्र रस्ते-पदपथावर अतिक्रमण करून पुन्हा फेरीवाले बसू लागले आहेत. त्यामुळे रस्त्यावर चालता फिरता खरेदीची सवय लागलेल्या नागरिकांनी मंडईमधून भाजी खरेदीऐवजी रस्त्यावर अतिक्रमण करून बसणाऱ्या फेरीवाल्यांकडूनच खरेदी सुरू करत त्यांना प्रोत्साहन दिले. त्यामुळे मंडईतील भाजीवाले आत धंदा होत नाही, म्हणून पुन्हा बाहेर बसू लागले.

सुरुवातीला काहींनी मंडईत गाळा आणि रस्त्यावरदेखील हातगाडा असा दुहेरी धंदा चालवला, मात्र बाहेरच फेरीवाले वाढले आणि मंडईतील धंदा ओस पडल्याने तेदेखील गाळे बंद करून रस्ते-पदपथावर बसू लागले. मंडईत बसणारे भाजीवाले वा बाहेर बसणारे फेरीवाले यांच्या भाजीपाल्याच्या दरात तसा फरक नव्हता. उलट मंडई बंद झाल्याने फेरीवाले मनमानी भाव नागरिकांकडून वसूल करत आहेत.

### अतिक्रमण करणाऱ्यांना संरक्षण?

- रस्ते-पदपथावर बसणाऱ्या फेरीवाल्याला बाजार शुल्क वसुली करणाऱ्या ठेकेदारास रोजचे सुमारे ६० रुपये पावतीचे द्यावे लागतात, तर पालिकेने कारवाई करू नये म्हणून हप्ता द्यावा लागतो.
- शिवाय भाज्या-फळेसुद्धा दिली जात असल्याचे आरोप होतात. शिवाय फेरीवाल्यांना विरोध न करण्यासाठी काही राजकारणी व माजी नगरसेवकांचे अर्थपूर्ण संरक्षण असते ते वेगळे.
- बेकायदा वीज जोडणीसाठी महिन्याला हजार रुपयांपर्यंत, तर हातगाडीचे भाडे म्हणून संबंधितास पैसे दिले जातात.
- एकूणच अतिक्रमण करणाऱ्यांना भ्रष्टाचारी मार्गाने संरक्षण मिळत असेल, तर मंडईत अधिकृतरीत्या फेरीवाले बसणार तरी कशाला, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

Scanned with CamScanner

सामना पा-नं.२०

धक्कादायक... एमपीएससीचा डेटा लीक

# लाखभर विद्यार्थ्यांचे हॉल तिकीट सोशल मीडियावर व्हायरल

## बेलापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

मुंबई, दि. २३ (प्रतिनिधी) – महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा (एमपीएसीचा) डेटा आज लीक झाल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. एमपीएसीच्या ३० एप्रिल रोजी होणाऱ्या गट 'ब' आणि गट 'क' परीक्षेला सामोरे जाणाऱ्या लाखभर विद्यार्थ्यांची हॉल तिकीट सोशल मीडियावर व्हायरल झाली आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांबरोबरच आयोगामध्येही खळबळ उडाली आहे. याप्रकरणी सीबीडी-बेलापूर पोलीस ठाण्यात माहिती-तंत्रज्ञान कायद्यांतर्गत गुन्हा दाखल झाला असून याचा तपास नवी मुंबई पोलीस आणि सायबर सेल करणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

एमपीएससीकडून घेतल्या जाणाऱ्या परीक्षेचे हॉल तिकीट आयोगाने दोन दिवसांपूर्वीच संबंधित विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने वाटप करण्यात आली आहेत. त्यानंतर आज सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका लिंकमध्ये ९० हजारांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांचे हॉल तिकीट असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे खळबळ उडाली असून विद्यार्थ्यांना हॉल तिकीट दिल्यानंतरसुद्धा एकाच लिंकवर सर्व विद्यार्थ्यांचे हॉल तिकीट व्हायरल होत असल्याने डेटा सिक्युरिटीचा प्रश्न समोर आला आहे. दरम्यान, हॉल तिकीट व्हायरल झाल्यानंतरही दोन तास लिंक सुरू कशी राहते? केवळ हॉल तिकीट व्हायरल झाले, डेटा लीक झाला नाही हे एमपीएससीला कसे कळले असे अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

### उमेदवारांचा अन्य डेटा लीक झालेला नाही - *एमपीएससी*

व्हायरल झालेल्या हॉल तिकिटाबाबत एमपीएससीने स्पष्टीकरण दिले आहे. त्यानुसार आयोगाने ३० एप्रिल रोजीच्या नियोजित विषयांकित परीक्षेची प्रवेश प्रमाणपत्रे २१ एप्रिल रोजी आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या वेबसाईटवर तसेच तात्पुरत्या बाह्यलिंकद्वारे उपलब्ध करून दिली होती. यापैकी बाह्यलिंकद्वारे उपलब्ध करून दिलेली प्रवेश प्रमाणपत्रे एका टेलिग्राम चॅनलवर प्रसिद्ध होत असल्याची बाब आज निदर्शनास आली आहे. सदर बाह्यलिंकद्वारे दिली जाणारी सुविधा बंद केल्याचे एमपीएससीने स्पष्ट केले आहे. तसेच हॉल तिकीट वगळता उमेदवारांचा कोणताही अन्य डेटा लीक झालेला नाही. याची तज्ज्ञांकडून खात्री करण्यात आली आहे. तसेच उमेदवारांचा कोणताही वैयक्तिक डेटा किंवा प्रश्नपत्रिका लीक झालेली नसल्याचे आयोगाने म्हटले आहे.

Scanned with CamScanner